नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:२३/०३/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.५२

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **शुक्रवार, दि.२७/०३/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे** भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

उप आयुक्त , विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र.२०२६

उप आयुक्त, परिमंडळ क्र.१ कार्यालयाचे नियंत्रणाखालील महापालिका सहाय्यक आयुक्त, ढोले पाटील, येरवडा कळस धानोरी व नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्यांबाबतची माहे फेब्रुवारी २०२६ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.१/१९८१, दि.१३/०३/२०२६ चे पत्र.

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र.२०२७

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०१/२०२६ ते दि.३१/०१/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.५/१९२१, दि.११/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र.२०२८

दिनांक २३/०२/२०२६ ते दिनांक ०१/०३/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण १११ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/१९७१, दि.१३/०३/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र.२०२९

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.३, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०२/२०२६ ते दि.१५/०२/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त

(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र मआ/परि. क्र.३/१९८२, दि.१६/०३/२०२६ चे पत्र.

मा. सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र.२०३०

मा. हर्षवर्धन मानकर, मा. स्वप्नील दुधाने व मा. सुहास टिंगरे यांचे दि.२०/०३/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिका च्या हद्दीत येणाऱ्या नागरिकांवर सध्या मिळकत कर थकबाकीवर दरमहा २% दराने शास्ती कर आकारण्यात येत आहे. सद्यस्थितीत वाढती महागाई, आर्थिक अडचणी आणि सर्वसामान्य नागरिकांवरील आर्थिक ताण लक्षात घेता, घरगुती करदात्यांवरील शास्ती कर दर १% करण्याची आवश्यकता आहे.

सध्याच्या धोरणानुसार, घरगुती आणि व्यावसायिक दोन्ही करदात्यांवर समान दराने शास्ती कर आकारला जात आहे. तथापि, मोठ्या थकबाकीदारांवर प्रभावी कारवाई न करता, उच्च शास्ती कर फक्त सामान्य घरगुती नागरिकांवर परिणाम करत आहे, जे अन्यायकारक आहे.

तसेच पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने गावे समाविष्ट करण्यात आली आहेत. या भागांतील नागरिक प्रथमच महानगरपालिकेच्या कर प्रणालीत आलेले असून, त्यांना कर भरण्याची सवय, नियमांची माहिती व आवश्यक सुविधा अद्याप पूर्णपणे उपलब्ध झालेल्या नाहीत. अनेक ठिकाणी रस्ते, पाणी, मलनिस्सारण यांसारख्या मुलभूत सुविधा अपुऱ्या आहेत. अशा परिस्थितीत, समाविष्ट गावांतील नागरिकांवर दरमहा २% शास्ती कर लादण्यात हे अन्यायकारक ठरत असून, त्याचा थेट आर्थिक फटका सामान्य नागरिकांना बसत आहे.

मिळकत कर विभाग हा पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असून, सन २०२५-२६ मध्ये दि १९/०२/२०२६ अखेर एकूण ११,०९,५१४ मिळकतधारकांकडून रु. २७१३.६० कोटी इतका महसूल प्राप्त झाला आहे. महानगरपालिका हद्दीत एकूण सुमारे १४,९२,००० मिळकती असूनही, त्यापैकी तब्बल ५,४१,३९२ मिळकतधारकांनी अद्याप थकबाकी भरलेली नाही, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. यावरून स्पष्ट होते की, थकबाकीचा मोठा हिस्सा हा मोठ्या थकबाकीदारांकडे प्रलंबित आहे. मात्र, अशा मोठ्या थकबाकीदारांवर प्रभावी व कठोर कारवाई मर्यादित प्रमाणात होत असताना, घरगुती करदात्यांवर दरमहा २% (वार्षिक २४%) इतका उच्च शास्ती कर सर्वसामान्य नागरिकांवर समानपणे लादला जात आहे.

यामुळे खालील गंभीर परिणाम दिसून येतातः

- लहान व मध्यम मिळकतधारकांवर अन्यायकारक आर्थिक ताण
- ज्येष्ठ नागरिक, पगारदार वर्ग व लघु व्यावसायिकांना मोठा फटका
- प्रामाणिक करदात्यांमध्ये असंतोष
- कर भरण्याची मानसिकता कमी होणे

दरम्यान, महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या अभय योजनेत दंडावर ७५% सवलत दिल्यानंतर, दि. १९/०२/२०२६ अखेर रु.९२४.७० कोटी इतकी मोठी वसुली झालेली आहे. यावरून स्पष्ट होते की, दंड कमी केल्यास करदाते सकारात्मक प्रतिसाद देतात आणि महसूल वाढीस मदत होते. तसेच, महानगरपालिकेने २३४ मिळकती सील करून जप्तीची कारवाई केली असली, तरी ती संख्या एकूण थकबाकीदारांच्या तुलनेत अत्यल्प आहे. त्यामुळे मोठ्या थकबाकीदारांवर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता, पुढील उपाययोजना आवश्यक आहेतः

• घरगुती करदात्यांना दिलासा देण्यासाठी शास्ती कर दर २% वरून १% करणे
• व्यावसायिक मोठ्या थकबाकीदारांवर विशेष वसुली मोहीम राबविणे
• जप्ती, सीलिंग व कायदेशीर कारवाई अधिक प्रभावीपणे करणे

तरी, कर वसुली अधिक सुलभ, न्याय्य व परिणामकारक करण्यासाठी, तसेच सर्वसामान्य नागरिकांवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी, मिळकत कर थकबाकीवरील शास्ती कर दर घरगुती करदात्यांसाठी २% वरून १% करण्यात यावा, आणि व्यावसायिक मोठ्या थकबाकीदारांवर कठोर व विशेष कारवाई करण्यात यावी, असा हा ठराव माननीय सभेसमोर मंजुरीसाठी मांडण्यात येत आहे."

विषय क्र.२०३१

मा. श्री. बाळा उर्फ प्रमोद ओसवाल व सौ. तन्वी दिवेकर यांचे दि.२३/०३/२०२६ चे पत्र.

प्रभाग क्र.३९ व प्रभाग क्र.२० अप्पर इ. नगर, लोअर इ नगर, सुप्पर इ. नगर, २७६ अप्पर परिसर, अप्पर ओटा विभाग

या ठिकाणी गेले अनेक वर्षापूर्वी पुणे म.न.पा.ने पर्वती पायथा, जनता वसाहत, झोपडपट्टी मधील घरे अप्पर इ. नगर बिबवेवाडी येथे ग.व.नी. खात्या अंतर्गत पुनर्वसन करण्यात आली होती. त्यावेळेस ती घरे खरीदी विक्री करता येत होती, त्याला मुख्य सभेची मान्यता घेण्यात आली होती. सदरची घरे विकल्यानंतर पुणे महानगरपालिकेने मुख्यसभेमार्फत केलेल्या धोरणानुसार रहिवासी गाळ्याकरिता १०,०००/-व्यावसायिक गाळ्याकरिता १५,०००/- रुपये शुल्क घेतल्यानंतर पुणे म.न.पा घर खरेदी करणाऱ्याच्या नावे भाडेपट्टा करीत असे. कालांतराने transfer फी वाढवण्यात आली आणि नव्याने भाडेपट्टा करणे चालू झाले होते. काही दिवसापूर्वी सदरचा transfer प्रस्ताव बंद करण्यात आला. त्यामुळे पुणे मनपाचे करोडो रुपयाचे आर्थिक नुकसान होत आहे.

तरी, अप्पर इ. नगर, लोअर इ. नगर, सुप्पर इ. नगर, २७६ अप्पर परिसर, अप्पर ओटा विभाग येथील निवासी घरांचे व व्यावसायिक गाळ्यांचे योग्य ते धोरण ठरवावे व नव्याने योग्य ते शुल्क आकारून घरे खरेदी विक्री करणाऱ्यांचे नावे घरे transfer करून त्यांचेशी नव्याने भाडेपट्टा करण्यास सुरुवात करावी.

विषय क्र.२०३२

मा. सौ. प्राची अल्हाट व मा. विशाल धनवडे यांचे दि.२३/०३/२०२६ चे पत्र.

प्रभाग क्रमांक ४१ मध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत स्वच्छ संस्थेकडून बैठकी घरे सोसायटी हॉस्पिटल हॉटेल व्यवसायिक अधिकचरा गोळा करण्यात येतो, पण स्वच्छ संस्थेकडून रोजचे रोज कचरा गोळा केला जात नसल्याने नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. सदर कचरा गोळा करण्यासाठी दरमहा शुल्क आकारल्याचे जाते परंतु प्रत्यक्षात रोजचे रोज कचरा गोळा करून घेतला जात नाही. सन २०१७ साली पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेली गावे त्यापैकी देवाची उरुळी फुरसुंगी भेकराईनगर परिसरामध्ये तेव्हापासून ते अद्याप पर्यंत नगरपालिका झाल्यानंतर देखील पुणे महापालिका घनकचरा व्यवस्थापन मार्फत विनामूल्य बैठकी घरे सोसायटी व्यावसायिक कचरा विनामूल्य घेतला जातो त्याच पद्धतीने प्रभाग क्रमांक ४१ मध्ये कारवाई करण्यात यावी.

तरी वरील बाब लक्षात घेता प्रभाग क्रमांक ४१ महंमदवाडी – उंड्री या प्रभागातील स्वच्छ संस्थेमार्फत उचलण्यात येणारा कचरा हा पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील घंटागाडी लावून सर्व नागरिकांचा येणारा कचरा निशुल्क घेण्यात यावा.

विषय क्र.२०३३

मा. सौ. प्राची अल्हाट व मा. विशाल धनवडे यांचे दि.२३/०३/२०२६ चे पत्र.

मौजे महंमदवाडी येथील स.नं. २६ या जागेमधून जाणारा १८ मी. व २४ मी. डी.पी. रस्त्यासाठी जागा संपादन करण्याची प्रक्रिया पूर्णत्वास आली आहे पण अद्याप श्री. जालिंदर घुले व श्री मंगेश घुले यांच्या जागेचे भूसंपादन पुणे मनपा मार्फत करण्यात आले नाही.

या कारणास्तव महंमदवाडी येथील १८ मी व २४ मी डी.पी. रस्याचे काम अर्धवट स्थितीत राहत आहे. पुणे महानगरपालिकेकडून संबंधित जागा मालकांना यापूर्वी जागा संपादन केल्याच्या बदल्यात टीडीआर द्वारे योग्य तो मोबदला देण्याची तयारी दर्शविली असताना देखील जागामालकांकडून अवास्तविकपणे मागणी करण्यात येताना दिसून येत आहे.

तरी मौजे महंमदवाडी येथील स.नं. २६ या जागेतील श्री. जालिंदर घुले व श्री. मंगेश घुले यांची डीपी रस्त्यासाठी लागणारी आवश्यक ती जागा "सक्तीचे भूसंपादन कायदायान्वे" पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात यावी.

विषय क्र.२०३४

मा. सौ. प्राची अल्हाट व मा. विशाल धनवडे यांचे दि.२३/०३/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिका पाणीपुरवठा विभागामार्फत लष्कर पाणीपुरवठा जलकेंद्र अंतर्गत हडपसर परिसरातील पाणी वितरण करण्यासाठी कंत्राटी पद्धतीने वॉलमन पुरवण्याचे टेंडर एकत्रित रद्द करून प्रभागानुसार पाणी वितरणासाठी वॉलमन पुरवण्याचे टेंडर लावून त्यानुसार कामकाज करण्यात यावे.

सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

विषय क्र.२०३५

स्व. राजीव गांधी ई-लर्निंग शाळा येथील साहित्य सम्राट विजय तेंडूलकर नाट्यगृह याकरिता जनरेटर पुरविणे, बनविणे, कार्यरत करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे M/s JVS ENGINEERING यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२३४९२६/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा ४.२०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४०५७०५९=११ अधिक जी.एस.टी. र.रु.७३०२७१/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४७८७३३०=११ काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर दिनांकापासून सुरु करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/२०२४, दि.२०/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र.२०३६

परिमंडळ क्रमांक ५ अंतर्गत असलेल्या श्री गणेश कला-क्रीडा रंगमंच, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, हिंदूहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार कलादालन येथे वातानुकूलित यंत्रणेचे देखभाल दुरुस्ती व वार्षिक ऑपरेटिंगची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे SHUBHAM UDYOG यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३८७४२०१/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा ५.४०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६६४९९४=१५ अधिक जी.एस.टी. र.रु.६५९६९९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४३२४६९३=१५ काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक

(१५-१२-२०२५) पासून सुरु करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/२०२५, दि.२०/०३/२०२६ चे पत्र.

मागील सभेचे विषय

विषय क्र.२०३७

भूमिगत केबलसाठी आकारणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीजीओ/४२२, दि.१०/०८/२०२१ चे पत्र.

(टीप:- सदर विषयाचा विचार दोन महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.१९/०१/२०२६ च्या सभेत ठरले होते.)

संकीर्ण

विषय क्र.२०३८

पुणे पेठ सोमवार राजश्री शाहू महाराज उद्यान येथील वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरिता चालविणेस देणेबाबत निविदा मागविली असता आलेल्या ४ निविदांपैकी निविदाधारक मे. पी.बी.पी. ग्रुप, पुणे यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रुपये १,०४,०२५/- ही मनपा निर्धारित रक्कम रुपये ५४,७५०/- पेक्षा रक्कम रुपये ४९,२७५/- म्हणजेच ९०% ने जास्त असल्याने सदर निविदा स्वीकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीनुसार प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर २% आयकर घेणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२००९, दि.१८/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र.२०३९

प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय निहाय 'अमृत महोत्सवी पुणे मनपा आरोग्य अभियान' अंतर्गत Animia व TB मुक्तीसाठी अभियान राबविणे या कामाचे देयक अदा करणेसाठी र.रु. १ कोटी आर्थिक तरतूद खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/२०१२, दि.१८/०३/२०२६ चे पत्र.

अर्थशीर्षक	कमी	अधिक
आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका बजेट कोड - RE17E101B शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम अंतर्गत (एनयुएचएम) बाह्यस्त्रोत पद्धतीने ठेकेदारांमार्फत भरावयाच्या सेवकांच्या वेतनापोटी मनपा हिस्सा (DATA ENTRY OPERATORS & ATTENDANT)	१ कोटी	---
नवीन सुचविलेले काम:- **आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका** **एनयुएचएम विभाग**		
RE17F334 प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय निहाय ' अमृत महोत्सवी पुणे मनपा आरोग्य अभियान' अंतर्गत Animia व TB मुक्तीसाठी अभियान राबविणे.	---	१ कोटी

विषय क्र.२०४०

चांदणी चौक ते भूगाव रस्ता विकसित करणे व त्यावरील चौकांवरती उड्डाणपुल /ग्रेड सेपरेटर बांधणे या कामाच्या अनुषंगाने खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२०१४, दि.१८/०३/२०२६ चे पत्र.

१) चांदणी चौक ते भूगाव रस्ता विकसित करणे व त्यावरील चौकांवरती उड्डाणपुल / ग्रेड सेपरेटर बांधणे या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ (ब) प्रमाणे मा. मुख्य सभेने र. रु. २००.०० कोटी इतक्या रक्कमेचे दायित्व स्वीकारणेस.

२) सदर कामासाठी सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या आर्थिक वर्षात पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये टप्प्याटप्प्याने तरतूद उपलब्ध करणेस.

विषय क्र.२०४१

नव्याने समाविष्ट ३२ गावांपैकी समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पॅकज-१० मधील केशवनगर (मुंढवा) येथे पाणी पुरवठा करणे कामी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/२०१०, दि.१८/०३/२०२६ चे पत्र.

१) नव्याने समाविष्ट ३४ गावांसाठी समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पॅकज-१० मधील केशवनगर (मुंढवा) येथे पाणी पुरवठा करणे करिता रक्कम रु.१३५,५७,३१,३२५/- पुढील ३ वर्षात (२०२६-२७,२०२७-२८,२०२८-२९) टप्प्याटप्प्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियम चे कलम ७२ (ब) अन्वये उपलब्ध होणेस व त्या रकमेचे दायित्व स्वीकारणेस.

विषय क्र.२०४२

पुणे मनपाच्या रावेत पम्पिंग स्टेशन ते चिखली जलशुद्धीकरण केंद्र दरम्यानच्या रॉ वॉटर पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिनीच्या गळतीची दुरुस्ती करणेचे काम ठेकेदार में अरिहंत कंस्ट्रक्शन इंडिया प्रायवेट लिमिटेड यांचे कडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये केल्याची बाब मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणे व सदरील काम पुणे मनपा हद्दीबाहेर केले असल्याने त्यासाठी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/२०१५, दि.१८/०३/२०२६ चे पत्र.

१) विषयांकित काम ठेकेदार मे अरिहंत कंस्ट्रक्शन इंडिया प्रायवेट लिमिटेड यांचे कडून महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये केल्याची व ठेकेदारास त्यांचे ०.५% कमी दराने र.रु.७१,५५,९५४=८५ + GST र.रु.१२,९४,५४४=६० + royalty र.रु.९४,४७०=६६ प्रमाणे एकूण र.रु.८५,३८,४९७=३८ निवेदनात नमूद अर्थशीर्षकामधून देयक आदा करणेस तसेच त्यापोटी आवश्यक पश्चात करारनामा करणेस, ५% अनामत रक्कम ठेकेदाराकडून वसूल करणे व हि बाब अवलोकनार्थ सादर करणेस

२) सदर काम महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार पुणे मनपा हद्दी बाहेर करण्यात आल्याच्या बाबीस मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची पश्चात मान्यता मिळणेस.

विषय क्र.२०४३

मा. नंदिनी सिद्धार्थ धेंडे व मा. हर्षल रमेश टिंगरे यांचे दि.२५/०२/२०२६ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र.१७८९, दि.२६/०२/२०२६ अन्वये मागविण्यात आलेला अभिप्राय विचारासाठी.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका

जावळे